पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी 411 018

अंकुशराव लांडगे नाट्यगृह

(म्यॅन्युअल क्र.१७)

## इतर माहिती

नाट्यगृहाच्या आरक्षणासंबंधी महत्वाची माहिती

१) नाट्यगृहाचे आरक्षणासाठी नियमानुसार असलेली अनामत रक्कम भरले शिवाय आरक्षण करता येत नाही.

२) अरक्षण केलेल्या दिनांकापासून ७ दिवस अगोदर नियमानुसार भाडे भरणे आवश्यक आहे.

३) भाडे भरलेली पावती कार्यक्रमाचे वेळी नाट्यगृहावरील कर्माचा-यास दाखविले नंतरच कार्यक्रम सुरू करता येईल.

४) केलेले आरक्षण रद्द करावयाचे झालेस कमीतकमी ७ दिवस अगोदर नाटयगृह कार्यालयास कळविणे आवश्यक आहे अन्यथा रद्द कार्यक्रमाचे भाडे भरावे लागेल.

५) नाट्यगृह आवारात बाहेरून खाद्यपदार्थ आणता येणार नाही.

६) आवश्यक तो पोलीस परवाना घेणे संबंधित संस्थेवर बंधनकारक राहील व सदरचा परवाना कार्यक्रमाच्या वेळेस त्यांचे जवळ असणे गरजेचे आहे.

७) नाट्यगृह आवारात खड्डे खोदणेस तसेच मंडप घालणेस सक्त मनाई आहे.

८) नाट्यगृह आसन क्षमता ९५२ इतकी असून त्यापेक्षा जास्त प्रेक्षक वर्ग येणार नाही याची दक्षता यासंबंधीत संस्थेने घ्यावयाची असून त्यापेक्षा जास्त येणा-या प्रेक्षकांना नाट्यगृहाचे कार्यालयातर्फे मज्जाव केला जाईल.

९) नाट्यगृह मालमत्तेचे कार्यक्रमाचे वेळेस नुकसान झालेस याची नुकसान भरपाई संबंधित संस्थेस द्यावी लागेल.

१०) नाट्यगृह मोफत देणेकामीची तरतूद कायद्यात नसलेने मोफत मिळणेकामी प्रयत्न करू नये.